भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षा निमित्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे / स्थळांचा विकास करणेबाबत कार्यपध्दती व निधी वितरण.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : सान्यावि-२०१७/प्र.क्र.३४३/बांधकामे,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१७.

वाचा:-

१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.सान्यावि-२०१५/प्र.क्र.१६३/ बांधकामे, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१४/प्र.क्र.६१/ बांधकामे, दिनांक १६ डिसेंबर, २०१५

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन पत्र क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.७६/ बांधकामे (शिकाना), दिनांक २३ डिसेंबर, २०१६

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.४७५/ बांधकामे, दिनांक २४ मार्च, २०१७.

५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.बैठक-२०१६/ प्र.क्र.४७५/ बांधकामे, दिनांक ३० जून,२०१७.

६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.बैठक-२०१६/ प्र.क्र.४७५/ बांधकामे, दिनांक ७ ऑगस्ट, २०१७.

प्रस्तावना :-

१. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रातील योगदान व आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व त्यांच्या संघर्षातून समाजाला प्रेरणा मिळावी म्हणून शासनाने दिनांक १४ एप्रिल, २०१५ ते १४ एप्रिल, २०१६ हे वर्ष "समता व सामाजिक न्याय वर्ष" म्हणून साजरे करण्यासाठी संदर्भाधीन क्र. (१) दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील भाग-१ मधील अ.क्र.६ नुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनाशी निगडीत असलेली घटनास्थळे व महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देऊन स्थळांचा विकास करणे या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त करावयाच्या कार्यक्रमांसाठी मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली असून या अंतर्गतच्या कार्यक्रमाबाबतचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रस्तुत समितीला प्रदान करण्यात आलेले आहेत.

२. संदर्भाधीन क्र. (१) दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त संदर्भाधीन क्र. (३) दि.२३/१२/२०१६ च्या शासन पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहे. सदर इतिवृत्ता सोबतचे परिशिष्ट-अ प्रमाणे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या एकूण २८ ठिकाणांची /स्थळांची यादी अंतिम करण्यात आली आहे. सदर ठिकाणांचा विकास करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, नगरपरिषदा /नगरपालिका /महानगरपालिका / ग्रामपंचायत इत्यादीकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांना समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर कामांना लागणारा रु.२०.०० कोटी (अक्षरी रक्कम रुपये वीस कोटी फक्त) इतका निधी संदर्भाधीन क्र. (४) दि.२४/३/२०१७ च्या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन दिलेला आहे. सदरचा निधी, आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आहंरित करुन सदरची तरतूद, ठेव अंशदान स्वरुपात समन्वयक तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग(इमारती), पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे.

३. संदर्भाधीन क्र. (६) दि.७/८/२०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये ,शासन निर्णय दिनांक २४ मार्च, २०१७ मधील परिच्छेद क्र.०३ वगळण्यात आला आहे. त्यामुळे १२५ व्या जयंती अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांसाठी सद्यस्थितीत कोणतीही नियमावली / निकष आस्तित्वात नाही. यास्तव १२५ व्या जयंती अंतर्गत प्रस्ताव प्राप्त करुन घेणे, त्यास मंजूरी देणे, निधीचे वितरण करणे, बांधकाम करणे, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देणे, उपयोगीता प्रमाणपत्र सादर करणे, तसेच वास्तूची देखभाल व दुरुस्ती इत्यादीबाबत कोणतीही नियमावली नसल्याने योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी येत आहेत. सदर बाब विचारात घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त निवड केलेल्या महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देऊन विकास करण्यासाठी स्थळांची निवड करणे व मंजूर केलेल्या निधीचे वितरण करणे, यासाठी कार्यपध्दती व निकष ठरविण्याची तसेच याअंतर्गत रू.पन्नास लक्षपर्यंतच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार आयुक्त, समाजकल्याण पुणे यांना प्रदान करावयाची बाबसुध्दा शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या घटनास्थळे व महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देऊन विकास करण्यासाठी ठिकाणांची निवड करणे व अनुदान मंजूर करण्यासाठी निकष व कार्यपध्दती खालील प्रमाणे निश्चित करण्यासाठी या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) <u>ठिकाणे / स्थळांची निवड करणे :-</u>

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेले घटनास्थळे निवड करण्याचे सर्व अधिकार संदर्भाधीन क्र.(१) दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद

केलेल्या मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीला असतील.

२) समितीने निवड केलेल्या घटना स्थळांना अनुदान मंजूरीचे अधिकार समितीला असतील.

३) स्वयंसेवी संस्था/ग्रामपंचायत/नगरपालिका/नगरपरिषद/कटक मंडळे/ महानगरपालिका किंवा अन्य सक्षम प्राधिकरणांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावे.

४) घटना स्थळांचा प्रारुप आराखडा व कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून अथवा संबंधीत क्षेत्रातील प्राधिकरणातील सक्षम प्राधिकारी (उदा. MMRDA, MHADA, SRA, NIT, MJP, CIDCO, नगरपालिका /नगरपरिषद/नगरपंचायत/कटकमंडळे/ महानगरपालिका/ ग्रामपंचायत / पंचायत समिती/ जिल्हा परिषद किंवा तत्सम प्राधिकारी) यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे.

५) कामाचे प्रारुप आराखडे, नकाशे, अंदाजपत्रके, खाजगी वास्तूविशारदांकडून तयार केलेले असल्यास, ते संबंधीत कार्यकारी अभियंता / अधिक्षक अभियंता / मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

६) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (संबंधीत) यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील आराखडे, नकाशे, अंदाजपत्रके प्रमाणित असल्याची खात्री करुन संबंधीत प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांनी आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

ब) **<u>बांधकामासाठी निधीचे वाटप :-</u>**

१) या कार्यक्रमांतर्गत निवड केलेल्या व मान्यता दिलेल्या ठिकाणे / स्थळांचे प्रस्तावास शासन स्तरावरुन स्वतंत्रपणे प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येईल.

२) यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, संबंधीत यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

३) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी त्यांनी संबंधीत प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांना वितरीत करावा. त्यानुसार प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांनी सदरचा निधी संबंधीत जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना यांच्या मार्फत संबंधित कार्यकारी यंत्रणेला उपलब्ध करुन दयावा.

४) काम पूर्ण झाल्यानंतर संबंधीत कार्यकारी यंत्रणेने काम पूर्णत्वाचा दाखला व निधी खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

क) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त ऐतिहासिक स्थळांचा विकास करणे या अनुषंगाने रू. ५० लक्षपर्यंतची कामे मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त, समाजकल्याण पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत. परंतु, सदर रू.५० लक्षपर्यंतच्या प्रस्तावाअंतर्गतची कामे संदर्भाधीन क्र.(१) दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठित केलेल्या मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या बैठकीमध्ये मंजूर करून घ्यावीत व तद्‌नंतर सर्व प्रकारच्या मान्यता, निधी वितरण इत्यादि बाबतची कार्यवाही प्रचलित नियमानुसार आयुक्त, समाजकल्याण पुणे यांनी त्यांचे स्तरावर करावी.

ड) **<u>प्रकल्पासाठी जमीन व मालकी हक्कासंदर्भात अटी व शर्ती :-</u>**

१) प्रकल्पाची जागा स्वयंसेवी संस्थेच्या मालकीची अथवा ग्रामपंचायत/पंचायत समिती/नगरपालिका/नगरपरिषद/कटक मंडळे/महानगरपालिका/ जिल्हा परिषद यांच्या मालकीची असावी वा शासकीय असावी.

२) प्रकल्पाची जागा संस्थेला खाजगी संस्था / व्यक्ती / व्यक्तींच्या मार्फत दान म्हणून मिळालेली असल्यास त्याबाबतचे कायदेशीर नोंदणीकृत/दानपत्र, जागा त्याच प्रयोजनासाठी वापरण्याबाबतच्या अटी व शर्ती बाबतचे करारपत्र सोबत जोडणे आवश्यक राहील.

इ.) **<u>प्रकल्पाचे बांधकाम व देखभाल दुरुस्तीबाबत</u>** :-

१) या कार्यक्रमांतर्गत विकसीत केलेल्या ठिकाणांचा / वास्तूंची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी प्रस्ताव दाखल करणाऱ्या संस्थेची राहील.

२) इमारतीची दुरुस्ती, परिरक्षण, दैनंदिन खर्च, स्थानिक कर, वीज बील, पाणीपट्टी व अन्य कर भरणे इत्यादींची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील. यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

३) प्रस्ताव स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत प्राप्त झाले असल्यास इमारतीची देखभाल / दुरुस्ती व इतर अन्य सर्व बाबींची जबाबदारी संबंधीत ग्रामपंचायत / पंचायत समिती / जिल्हा परिषद / नगरपालिका/ नगरपरिषद / महानगरपालिका यांची राहील.

४) संबंधीत स्वयंसेवी संस्था प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती करण्यास सक्षम नसतील, तर संबंधीत जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग हे देखभाल दुरुस्तीसाठी सक्षम असणाऱ्या कोणत्याही संस्थेची निवड करुन त्यांचेशी करार करुन जबाबदारी सोपवतील.

५) वास्तू ज्या प्रयोजनार्थ उभारली आहे, तीचा वापर त्याच कारणासाठी होणे आवश्यक राहील, अन्य प्रयोजनार्थ करता येणार नाही.

५. **<u>इतर मार्गदर्शक तत्त्वे</u> :-**

(१) संस्थेच्या प्रकल्प बांधकाम इमारतीवर " सदर प्रकल्पाचे बांधकाम सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग , महाराष्ट्र शासन यांचेकडून मिळालेल्या अनुदानातून करण्यात आले आहे." असा नामफलक लावण्यात यावा.

(२) मंजूर करण्यात आलेला निधी त्याच कारणासाठी वापरण्यात यावा. निधीचा अपहार / अनियमिता झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत कार्यकारी यंत्रणेची राहील.

(३) निधी खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांच्या मान्यतेने आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करतील.

(४) इमारती / वास्तू देखभाल व दुरुस्तीबाबत करारनामा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे संबंधीत संस्थेबरोबर करतील.

६. संदर्भाधीन क्र. (६) येथील दि.०७.०८.२०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये , संदर्भाधीन क्र. (४) येथील दिनांक २४ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.०३ पूर्णत: वगळण्यात आला असल्याने या प्रयोजनार्थ आता शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२०१४/प्र.क्र.६१ /बांधकामे, दिनांक १६ डिसेंबर, २०१५ मधील तरतूदी लागू होणार नाहीत.

७. संदर्भाधीन क्र. (४) येथील दिनांक २४ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये या कामाच्या प्रयोजनार्थ उपलब्ध करुन दिलेला रु.२०.०० कोटी (अक्षरी रक्कम रुपये वीस कोटी फक्त) इतका निधी आहंरीत करुन अंशदान ठेव स्वरुपात समन्वयक तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती), पुणे यांचे अधिनस्त ठेवण्यात आलेला आहे. आता सदरचा आहंरीत केलेला निधी संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना वितरीत करावा. संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी सदरचा निधी शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे संयुक्त बँक खात्यात ठेऊन नियमानुसार खर्च करावा.

८. यावरील खर्च हा "**मागणी क्रमांक एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, ७८९-अनुसूचित जाती घटक योजना, ०२- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे (योजनांतर्गत-दत्तमत) लेखाशिर्ष २२२५ डी-८२३**" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा. यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, संबंधीत यांना आहंरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

९. प्रस्तूतचा शासन निर्णय भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त करावयाच्या कार्यक्रमाकरीता मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीस संदर्भाधीन क्र.(१) येथील शासन निर्णयान्वये दिलेल्या अधिकारानुसार, तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला,

उपविभाग-पाच, अनुक्रमांक १- महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्रमांक १३४ खाली प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१०. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७१०१२१६३३४१७१२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justic and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d81b5c910bad5837d7f88ac97a75b312f0e5744ecbdc45b7704dcb27f5d4dfef, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2017.10.12 16:23:58 +05'30'

(अ.कों.आहिरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.विरोधी पक्षेनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
४) सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर
६) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
७) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
९) मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव.
१०) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव.
११) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, सर्व.
१२) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सर्व.
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
१४) निवडनस्ती, कार्यासन-बांधकामे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मुंबई.